फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३/२०२३ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश
**CNR No.MHPU170004352023.**
भिमाबाई सोमनाथ व्यवहारे वि. हनुमंत सोमनाथ व्यवहारे वगैरे.

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ नुसार गैरअर्जदार यांचेकडून तिला प्रत्येकी दरमहा रक्कम रु. ४,०००/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये १६,०००/- अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथने व अर्जदार हिचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद असा की, अर्जदार हिचे पती सोमनाथ सावळा व्यवहारे हे सन १९८१ मध्ये मयत झालेले असुन गैरअर्जदार हे अर्जदार व मयत सोमनाथ यांची मुले आहेत. अर्जदार हिने तिच्या पतीच्या निधनानंतर, गैरअर्जदार यांचा सांभाळ करुन त्यांचे शिक्षण व लग्न करुन दिलेले आहे. सन १९९९ मध्ये अर्जदार हिने जमिनीचे वाटप करुन दिले असुन गैरअर्जदार हे स्वतंत्रपणे आपापल्या जमिनी वहिवाटुन उत्पन्न घेत आहेत. तेव्हापासुन अर्जदार ही गैरअर्जदार यांच्यापासुन वेगळी रहात असुन गैरअर्जदार हे तिच्या घरखर्चासाठी, औषधपाण्यासाठी मदत करीत होते परंतु, गेल्या १० वर्षांपासुन गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिच्या खाण्या-पिण्याची काहीएक सोय केली नाही. गैरअर्जदार क्र.४ याचे हार्नियाचे ऑपरेशन झालेपासुन त्याची आर्थिक अडचण असल्याने त्याचे कुटूंबाचे भागत नाही, म्हणुन जानेवारी २०२३ पासुन त्याने देखील मदत करणे बंद केले आहे.

३. अर्जदार हिचे कथन की, ती वयोवृध्द असुन तिला कसलाही कामधंदा करता येत नाही, तिला काहीएक उत्पन्न नाही. ती सतत दमा, रक्तदाब या विकारांनी आजारी असुन तिला औषधोपचारासाठी दरमहा १०,०००/- रुपये खर्च येतो. गैरअर्जदार अर्जदार हिला सांभाळत नसल्याने ती नातेवाईकांच्या मेहरबाणीवर कसेबसे जीवन जगत आहे. गैरअर्जदार क्र.१ हा इंजिनिअर असुन तो पुणे येथे त्याच्या पत्नीसह रहात आहे. गैरअर्जदार क्र.२ हा पंचायत समिती, इंदापूर येथे पाटबंधारे विभागात नोकरीस आहे. गैरअर्जदार हे त्यांच्या शेतजमिनी मध्ये ऊसासारखी बागायती पिके घेत असुन त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे, अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४.	प्रस्तुतकामी गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी निशाणी क्र.१८ वर त्यांचे म्हणणे दाखल केले असुन अर्जदाराच्या अर्जातील मजकुर खोटा असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांच्या कथनानुसार, अर्जदार हिचे पती व गैरअर्जदार यांचे वडील सोमनाथ यांना स.नं.५६६/२ब व गट नं.९७/२ब/१, जुना स.नं.७०५/२ब/१ अशा वडिलार्जित मिळकती होत्या. दिनांक ०८/०८/१९८८ रोजी अर्जदार व गैरअर्जदार यांनी सर्व सहमतीने स.नं.५६६/२/ब ही जमीन विक्री केली असुन त्याच्या व्यवहारातुन आलेल्या पैशांमधुन दिनांक २७/०९/१९८८ रोजी अर्जदार व गैरअर्जदार यांनी सर्वे नं.७०४/१/१ पैकी उत्तरेची ०१हे.६० आर ही गैरअर्जदार क्र.२ व ४ यांच्या नावे खरेदी करुन त्यातील ००हे.४० आर जमीन ही गैरअर्जदार क्र.४ याने गैरअर्जदार क्र.२ सह विक्री केल्याचे दाखविले. मात्र सदरच्या व्यवहाराचा मोबदला गैरअर्जदार क्र.४ याने एकटयाने घेतला. गैरअर्जदार क्र.४ याने ००हे.२० आर जमीन लतिका नागनाथ व्यवहारे यांच्या नावे केली व पुढे गैरअर्जदार क्र.४ याने सौ.रंजना भरत व्यवहारे व तुकाराम कृष्णा बनकर यांना सदर जमिनीपैकी दिनांक ०३/०४/२००७ रोजी ००हे.२० आर जमीन इतरांना विश्वासात न घेता विकली. गैरअर्जदार क्र.४ याने २४/०२/२०२२ रोजी अर्जदार हिस रक्कम रुपये २,४०,०००/- देवुन अनाधिकाराने अर्जदार हिने खरेदी दिल्याचे दाखविले. गैरअर्जदार क्र.४ याने अर्जदार हिस सदर रक्कम दिली असेल तर त्या पैशांच्या व्याजावर देखील अर्जदार हिचा ऊदरनिर्वाह भागणे शक्य आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी अर्जदाराच्या नावावरील ०१ एकर जमीन त्यांचे हयातभर त्यांना वहिवाट्‌ द्यायची व त्यातील उत्पन्न द्यायचे असे ठरले होते परंतु गैरअर्जदार क्र.४ याने स्वतःच्या हिश्याच्या जमिनी अगोदरच विकुन वाटपपत्रामध्ये अर्जदार हिस अर्धा एकर क्षेत्र देवुन फसवणुक केली व उर्वरीत २१ आर क्षेत्र देखील अर्जदाराकडुन मोबदला न देता खरेदी करुन घेतले.

५.	गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांचे कथन की, गैरअर्जदार क्र.१ हा पुणे येथे नोकरीनिमीत्त राहण्यास असुन त्याची जमीन गैरअर्जदार क्र.४ कडे वाटयाने होती परंतु तो काहीही पैसे गैरअर्जदार क्र.१ यास देत नव्हता. त्यामुळे, ०२ वर्षांपुर्वी गैरअर्जदार क्र.१ याने त्याची सदर जमीन गैरअर्जदार क्र.३ यास वाटयाने दिली त्यामुळे त्याचा राग मनात धरुन गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांच्याकडुन पोटगी

उचलुन स्वतःच्या घशात घालण्यासाठी गैरअर्जदार क्र.४ प्रयत्न करीत आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदाराचा सांभाळ करण्यास कधीही नकार दिलेला नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे पुणे येथे जायची व रहायची. गैरअर्जदार क्र.४ हा अर्जदार हिच्यावर दबाव टाकुन तिला गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांच्याकडे जावु देत नाही. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत न्यायालयात रे.मु.नं.२८०/२०२३ हा दाखल केला असुन त्या दाव्याला शह देण्यासाठी प्रस्तुतचा खोटा अर्ज अर्जदार हिस पुढे करुन केलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ३ हे अर्जदार हिस सांभाळण्यास तयार आहेत, म्हणुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

६. अर्जदार हिने यादी निशाणी क्र.३ सोबत मौजे माळवाडी येथील जमीन सर्व्हे नं.९६/१/अ/१, ९७/२/ब/१ यांच्या ७/१२ उता-यांच्या छायांकित प्रती, अर्जदार हिच्या आधारकार्डाची छायांकित प्रत, तसेच यादी निशाणी क्र.१७ सोबत अर्जदार हिच्या वैद्यकीय उपचाराच्या बिलांच्या मुळ पावत्या, यादी निशाणी क्र.२९ सोबत अर्जदार हिच्या वैद्यकीय उपचाराची मुळ कागदपत्रे व बिले, इ.कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदार हिने तिचे मालमत्ता व देणे यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.३० वर दाखल केले आहे.

७. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी यादी निशाणी क्र.२१ सोबत मौजे माळवाडी येथील जमीन सर्व्हे नं.९६/१/अ/२, ९७/२/ब/१, ९६/१/अ/१, मिळकत क्र.६२ चा नमुना ८ चा उतारा, फेरफार क्र.१७९९५, १७९८१, ११३२, १६२८, १९१५५, ४२८, ४२९, ३८५, ३८३, २६३८, ३३७० च्या उता-यांच्या छायांकित प्रती, रे.मु.नं.२८०/२०२३ मधील निशाणी क्र.१ व ५ च्या छायांकित प्रती, यादी निशाणी क्र.२५ सोबत एक फोटो, यादी निशाणी क्र.२७ सोबत पी.डी.सी.सी.बँकेतील वैयक्तिक कॅश क्रेडीट मर्यादा फॉर्म, गैरअर्जदार क्र.२ याच्या औषधोपचाराची कागदपत्रे, बिले, गैरअर्जदार क्र.१ याचे कर्जखात्याचे प्रमाणपत्र, रे.मु.नं.२८०/१३ मधील निशाणी क्र.१ ची प्रत, गैरअर्जदार क्र.३ च्या बँक पासबुकाची प्रत, गैरअर्जदार क्र.३ ची वैद्यकीय उपचाराची कागदपत्रे व बँक पासबुक व कर्जाच्या खतावणीचा उतारा, इ.कागदपत्रांच्या छायांकित प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. तसेच,

गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या मालमत्ता, उत्पन्न व खर्चाबाबतची प्रतिज्ञापत्रे अनुक्रमे निशाणी क्र.३१ ते ३२ वर दाखल केली आहेत.

८.        अर्ज व अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले तसेच अर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात, त्यावर कारणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिने सिध्द केले आहे काय की, ती मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार यांच्याकडुन अंतरिम पोटगी म्हणुन प्रत्येकी दरमहा रक्कम रु.४,०००/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये १६,०००/- प्रमाणे मिळण्यास ती पात्र आहे? असल्यास किती? | अंशतः होकारार्थी.<br><br>अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांच्याकडुन दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- प्रमाणे दरमहा एकुण रक्कम रु. ४,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. |
| २) | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

मुद्दा क्रमांक १ करीता -

९.        अर्जदार हिने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार ही तिची मुले असुन तिचे पती सोमनाथ सावळा व्यवहारे हे सन १९८१ मध्ये मयत झाल्यानंतर अर्जदार हिने गैरअर्जदार यांचा सांभाळ करुन त्यांचे शिक्षण व लग्न करुन दिले. तसेच, सन १९९९ मध्ये अर्जदार हिने जमिनीचे वाटप करुन दिले असुन गैरअर्जदार हे स्वतंत्रपणे आपापल्या जमिनी वहिवाटुन उत्पन्न घेत असुन अर्जदार ही गैरअर्जदार यांच्यापासुन वेगळी रहात आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिच्या खाण्या-पिण्याची काहीएक सोय केली नाही. गैरअर्जदार क्र.४ याने देखील जानेवारी २०२३ पासुन त्याने देखील मदत करणे बंद केले आहे. अर्जदार वयोवृध्द असुन तिला कसलाही कामधंदा करता येत नाही, तिला काहीएक उत्पन्न नाही. ती सतत दमा, रक्तदाब या विकारांनी आजारी असुन तिला औषधोपचारासाठी दरमहा १०,०००/- रुपये खर्च येतो. अर्जदार हिने यादी निशाणी क्र.१७ व निशाणी क्र.२९ सोबत तिच्या वैद्यकीय उपचाराची कागदपत्रे व बिले, इ.कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत.

१०. अर्जदार हिच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ हा इंजिनिअर म्हणुन पुणे येथे काम करीत आहे व गैरअर्जदार क्र.२ हा पंचायत समिती, इंदापूर येथे पाटबंधारे विभागात नोकरीस आहे. तथापि, गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी त्यांची मालमत्तेबाबतची शपथपत्रे अभिलेखावर दाखल केलेली असुन त्यामध्ये ते नोकरी करीत आहेत असे कथन केले आहे. परंतु त्यांच्या निश्चीत उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार हिने अभिलेखावर केलेला नाही. गैरअर्जदार यांना शेतजमीन असल्याबाबत अर्जदार हिने निशाणी क्र.३ सोबत अर्जदार मौजे माळवाडी येथील जमीन सर्व्हे नं.९६/१/अ/१, ९७/२/ब/१ यांच्या ७/१२ उता-यांच्या प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत तथापि, सदरहु ७/१२ उतारे हे छायांकित प्रती आहेत. त्यामुळे, गैरअर्जदार यांना शेतजमीन असुन त्यांना त्यापासुन निश्चीत किती उत्पन्न मिळते याबाबत आजरोजी सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तथापि, आजरोजी अर्जदार ही वयोवृध्द असुन गैरअर्जदार ही तिची मुले आहेत या बाबी वादातीत नाहीत. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचे पालनपोषण, औषधोपचार करण्याची त्यांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे व ती त्यांनी पार पाडल्याचे दिसुन येत नाही.

११. अर्जदार ही वयोवृध्द असुन तिला कोणताही कामधंदा होत नाही व ती दमा, रक्तदाब या विकारांनी आजारी असुन तिला औषधोपचारासाठी खर्च येत असल्याबाबत अर्जदार हिने शपथेवर कथन केले आहे. गैरअर्जदार यांच्यावर अर्जदार हिच्या पालनपोषणाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी होती व सदर जबाबदारी त्यांनी पार पाडल्याबाबत अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आजरोजी प्रस्तुतचा अर्ज हा अत्यंत प्राथमिक स्थितीत असुन अर्जदार हिची कथने पुराव्याअंतीच शाबी होणार आहेत.

१२. वर नमुद गोष्टींचा एकत्रीत विचार करता, गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी अर्जदार हिस दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- प्रमाणे, एकुण रक्कम रु. ४,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन, मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्याचा आदेश होणे न्यायोचीत वाटते, म्हणुन मुद्दा क्र. १ करीता, अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवीत आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u> -

१३. मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष विचारात घेता, अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- प्रमाणे एकुण रक्कम रु. ४,०००/- अंतरिम पोटगी अर्जदार हिस, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३) सदर आदेशाची प्रत अर्जदार हिस विनामुल्य देण्यात यावी.

स्वाक्षरित/---
( पी. एल. पाटील )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

इंदापूर.
दिनांक –१३.०३.२०२४.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

" मी, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ.फाईलच्या आदेशातील मजकुर हा तिच्या मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दांनुसार समान आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | र. सि. पारवे,<br>लघुलेखक निम्नश्रेणी -३. |
| न्यायालयाचे नांव व पदनाम | - | पी.एल.पाटील,<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारीख | - | १३.०३.२०२४. |
| आदेश न्यायिक अधिकारी यांनी स्वाक्षरित केल्याची तारीख | - | १३.०३.२०२४. |
| आदेश सी.आय.एस.प्रणाली मध्ये अपलोड केल्याची तारीख | - | १५.०३.२०२४. |